




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २१६ * नांदेड * शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेडमध्ये पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल यांच्यावर हल्ला

- झेड प्लस सुरक्षेतही हल्ला; बादल यांच्या हाताला किरकोळ दुखापत, हल्लेखोर ताब्यात
- एसपीयूच्या अधिकाऱ्यामुळे मोठा अनर्थ टळला



**नांदेड (प्रतिनिधी)**– पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री तथा शिरोमणी अकाली दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखबीरसिंघ बादल यांच्यावर नांदेड येथील गुरुद्वारा मातासाहिब परिसरात खंजीराने हल्ला करण्यात आला. ही घटना गुरूवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. या हल्ल्यात बादल यांच्या उजव्या हाताला किरकोळ दुखापत झाली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांच्यावर नांदेडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यादरम्यान एसपीयुचा एक जवानही जखमी झाला आहे.

सुखबीरसिंघ बादल हे आपल्या कुटुंबियांसह पत्नी माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार हरसिमरन कौर आणि दोन मुली यांच्यासह दोन दिवसांच्या दौऱ्यावर सचखंड गुरुद्वाराचे दर्शन व अखंड पाठसाठी नांदेडमध्ये आले आहेत. नांदेडमधील विविध गुरुद्वारांचे दर्शन घेण्याचा त्यांचा कार्यक्रम होता.

गुरुवारी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास ते शहरापासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या माता साहिब गुरुद्वाराचे दर्शन आटोपून पायऱ्यांवरून खाली येत असताना आरोपी जसपालसिंघ निहंग ह्या सेवादाराने अचानक त्यांच्यावर खंजीराने (कृपान) हल्ला केला. जसपालसिंघ हे गुरूद्वारा येथे सेवादार म्हणून दोन वर्षांपासून काम करत होते. ते व्यवसायाने वकील आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, बादल यांच्या दिशेने येत असताना हल्लेखोर सरेंडर-सरेंडर असे ओरडत होता. त्याच्या हातात खंजीर असल्याचे लक्षात येताच सुरक्षारक्षक आणि पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला.

यावेळी नांदेड एसपीयूचे अधिकारी संतोष केंद्रे यांनी प्रसंगावधान राखत धाव घेऊन हल्लेखोरावर झडप घातली आणि त्याला ताब्यात घेतले. त्यांच्या धाडसी हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला.

मात्र या झटापटीदरम्यान हल्लेखोराच्या हातातील खंजीर बादल यांच्या उजव्या हाताला लागल्याने त्यांना दुखापत झाली. हल्लेखोराला पकडताना अधिकारी संतोष केंद्रे देखील जखमी झाले असून त्यांच्यावर जुन्या कौठा भागातील यशोसाई हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले आहे. यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अर्चना पाटील यांनीही रुग्णालयात जाऊन त्यांची विचारपूस केली.

### पोलिसांचा तपास सुरू

सुखबीरसिंघ बादल यांना झेड प्लस सुरक्षा असतानाही हा प्रकार घडल्याने सुरक्षाव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांच्या सुरक्षा पथकाने हल्लेखोराला जवळ येण्यापूर्वीच रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु संतोष केंद्रे यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

पोलिसांनी हल्लेखोराला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. हल्ल्यामागील नेमका उद्देश काय होता, हा हल्ला पूर्वनियोजित होता का आणि त्यामागे आणखी कोणी आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

### घटनेचे पडसाद पंजाब राज्यातही

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंघ बादल यांच्यावर झालेल्या हल्ल्याचे पडसाद पंजाब राज्यात उमटले आहेत. पंजाब राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांचा या हल्ल्यामागे काही हात आहे का? याचा तपास आता तपास यंत्रणा करणार आहे. दुपारपासूनच पंजाब राज्यातील सर्वच प्रसार माध्यमावर या घटनेचे वृत्तांत दाखविण्यात येत आहेत.

# जिल्हा कारागृहात कैद्याचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील मध्यवर्ती जिल्हा कारागृहात गुरूवारी एका कैद्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.


नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुयडवाडी येथील राहणारा गजानन पुयड (वय ४२) हा मागील २०२४ पासून जिल्हा कारागृहात पोक्सो गुन्ह्यांतर्गत शिक्षा भोगत होता. रात्री त्याला अस्वस्थ वाटल्याने तातडीने जेल प्रशासनाने शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची माहिती समजताच नातेवाईकांनी वजिराबाद पोलीस ठाणे गाठून संताप व्यक्त केला. कारागृहात त्याला जेवण देत नव्हते असा आरोप नातेवाईकांनी केला असून संबंधिताविरुद्ध कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी लावून धरली होती.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन समारंभ शनिवार १५ ऑगस्ट २०२६ रोजी साजरा करण्यात येणार आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ९.०५ वा. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांच्या ध्वजारोहणाचे कार्यक्रम सकाळी ८.३५ वाजेपूर्वी किंवा ९.३५ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बॅग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.







जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता?

पावसाळा आला की, शहरांचे खरे चित्र समोर येते. रस्ते धुऊन निघतात, पण विकासाचे दावेही वाहून जातात. पावसाच्या पाण्याने डांबराचा थर नाहीसा होतो आणि त्याखाली दडलेली 'व्यवस्थेची गुणवत्ता आणि भ्रष्टाचाराचा चिखल' उघडा पडतो. मग सुरू होते खड्ड्यांची मोजदाद, पाहणीचे दौरे, अधिकाऱ्यांना सूचना, तातडीच्या बैठका आणि खड्डे बुजविण्याच्या घोषणा. काही दिवसांनी पुन्हा पाऊस येतो आणि केवळ कागदावर बुजविलेले खड्डे पुन्हा उघडतात! ही महाराष्ट्राच्या शहरांची वर्षानुवर्षांची विकासगाथा आहे. स्मार्ट शहरांची घोषणा उन्हाळ्यातल्या ढगांसारखी आकाशातच विरून गेली. नाशिक-मधील रस्त्यांवरील खड्ड्यांची मुख्यमंत्री यांनी दखल घेऊन प्रशासनाला निर्देश दिले, ही निश्चितच चांगली बाब आहे. पण नाशिकपुरतेच का? मुख्यमंत्री यांच्या नजरेत न आलेल्या शहरांतील रस्ते काय कमी दर्जाचे आहेत? पुणे, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी, सोलापूर, नागपूरसह राज्यातील कित्येक शहरांमध्ये नागरिक खड्ड्यांमधूनच प्रवास करीत आहेत. नाशिकच्या खड्ड्यांना मुख्यमंत्र्यांची नजर मिळाली; मग बाकी शहरांतील लोकांनी काय पाप केले? गणेशोत्सव तोंडावर आला आहे. मंडप उभे राहत आहेत, गणेशमूर्तींचे आगमन सुरू झाले आहे, बाजारपेठांमध्ये गर्दी वाढत आहे. मिरवणुका, ढोल-ताशे, भाविकांची गर्दी आणि वाहनांची वर्दळ वाढणार आहे. पण शहरातील रस्ते पाहिले की वाटते, गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी प्रशासनाने रस्ते नव्हे तर खड्ड्यांचीच आरास केली आहे! कुठे छोटा खड्डा, कुठे मोठा खड्डा, तर कुठे रस्ता पूर्णपणे गायब. नागरिकांनी वाहन चालवायचे की खड्ड्यां-मधून 'अडथळा शर्यत' खेळायची, असा प्रश्न पडतो. या खड्ड्यांचा त्रास केवळ वाहनचालकांना होत नाही. दुचाकीस्वारांच्या पाठीचे मणके रोजच्या धक्क्यांनी थकले आहेत. मानदुखी, पाठदुखी, सांधेदुखी आणि हाडांच्या समस्यांचा सामना अनेकांना करावा लागतो. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी तर हा प्रवास अक्षरशः धोकादायक ठरतो. रुग्णवाहिका खड्ड्यांतून जाताना रुग्णाचा आजार वाढण्याची शक्यता निर्माण होते. एखाद्या गर्भवती महिलेला रुग्णालयात नेताना चालकाला प्रत्येक खड्डा चुकवावा लागतो किंवा त्याच खड्ड्यातून रुग्णवाहिका नेल्यास त्या महिलेची प्रसूती ॲम्बुलन्समध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही, ही आपल्या 'स्मार्ट' शहरांची वस्तुस्थिती आहे! खड्ड्यांमुळे पेट्रोलचा खर्च वाढतो, वाहनांचे नुकसान होते आणि प्रवासाचा वेळही वाढतो. वाहनांच्या सस्पेन्शनपासून टायरपर्यंत सर्व काही नागरिकांच्या खिशातून दुरुस्त करावे लागते. म्हणजे रस्ता खराब करणारे एक आणि त्याची किंमत भरणारे दुसरे! कर नागरिकांनी भरायचा, रस्त्याचा त्रास नागरिकांनी सहन करायचा आणि दुरुस्तीच्या नावाखाली पुन्हा पैसा नागरिकांचाच खर्च करायचा! याला विकास म्हणायचे तरी कशाला? खरा प्रश्न मात्र खड्ड्यांचा नाही; खड्डे पुन्हा पुन्हा का निर्माण होतात, हा आहे. दरवर्षी रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्च होतात. नवीन रस्ते तयार होतात, डांबरीकरण होते, उद्घाटने होतात, फलक लागतात आणि पुढच्या पावसाळ्यात रस्ता पुन्हा उखडतो. आता तर मनपाने प्रगतीचा पुढचा टप्पा गाठला आहे. आता केवळ रस्त्यात खड्डे दिसत नाहीत तर विशालकाय भगदाड पडतात ज्यामध्ये कार आणि ट्रक यासारखी वाहन धसतात मग इतर वाहनांचं आणि माणसाचं काय? मागील वर्षी खर्च केलेला पैसा कुठे गेला? कामाची गुणवत्ता तपासली कोणी? ठेकेदाराची जबाबदारी निश्चित झाली का? संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी केली का? की रस्ता तयार होण्याआधीच त्याच्या आयुष्याची मुदत संपलेली असते? काही ठिकाणी उद्घाटन होण्यापूर्वीच बांधलेले पूल कोसळतात. या सगळ्या प्रक्रियेत भ्रष्टाचाराच्या आरोपांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. निकृष्ट दर्जाचे काम, कंत्राटदारांचे हितसंबंध, देखरेखीतील त्रुटी आणि जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती यांची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. 'खड्डा बुजविणे' हा तात्पुरता उपाय आहे; पण खड्डे निर्माण करणाऱ्या व्यवस्थेची चौकशी हा कायमस्वरूपी उपाय आहे? दुर्दैवाने राजकीय इच्छाशक्तीचा अभावही तितकाच गंभीर आहे. म्हणून चौकशीचे केवळ नाटक केले जाते आणि त्या गुत्तेदाराला पूर्णपणे अभय दिले जाते. शहरातील प्रत्येक प्रमुख रस्त्याची पावसाळ्यापूर्वी पाहणी करणे, धोकादायक ठिकाणे निश्चित करणे आणि गुणवत्तापूर्ण दुरुस्ती करणे, हे प्रशासनाचे नियमित काम असायला हवे. त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची वाट पाहावी लागणे हीच व्यवस्थेची शोकांतिका आहे. आणखी मोठी शोकांतिका म्हणजे सम ाजाची उदासीनता. खड्ड्यात पडून अपघात झाला की दोन दिवस संताप व्यक्त होतो. एखाद्याचा जीव गेला की निषेध होतो. सोशल मीडियावर फोटो फिरतात. मग काही दिवसांनी सगळे शांत. आपण खड्ड्यांना दोष देतो; पण खड्डे निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस कितजण करतात? गणेशोत्सवाच्या आधी प्रशासनाने केवळ नाशिकच नव्हे, तर राज्यातील सर्व शहरांतील प्रमुख रस्त्यांचे युद्धपातळीवर सर्वेक्षण करावे. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करावी. संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. रस्त्याच्या कामाचा खर्च, ठेकेदार, गुणवत्ता तपासणी आणि दोषदायित्वाची माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक करावी. कारण शेवटी रस्ता हा केवळ डांबराचा पट्टा नसतो; तो नागरिकांच्या जीवनाचा मार्ग असतो आणि नागरिकांच्या पैशातून तयार केलेला असतो. कोणताही नेता किंवा अधिकारी स्वतःच्या खिशातून यासाठी खर्च करीत नाही. म्हणून रस्त्यावरचा प्रत्येक खड्डा हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर उमटलेला काळा ठिपका आहे. गणपती बाप्पा येणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी शहर सजणार आहे. पण त्याआधी प्रशासनाने स्वतःला एक प्रश्न विचारावा की, बाप्पाच्या मिरवणुकीसाठी रस्ता तयार करणार की खड्ड्यांमधूनच विकासाची मिरवणूक काढणार?

# 'मेरी मिट्टी मेरा देश...'



आपल्या भारत देशाला स्वातंत्र्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला.... फार मोठे स्वातंत्र्य समर लढावे लागले.... या स्वातंत्र्याच्या यज्ञामध्ये अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली... सर्वस्वाचा त्याग केला..... तेव्हा कुठे आपला देश स्वातंत्र्य झाला... याचे जाण आणि भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे.... जात-पात-धर्म यापेक्षा देश महत्त्वाचा असतो हे प्रत्येकाच्या मनात रुजले पाहिजे.... देशभक्ती, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रसेवा या मूल्यांची रुजवण आणि जोपासना झाली पाहिजे.... घराघरात आणि मनामनात राष्ट्रनिष्ठा वाढली पाहिजे.... आपला देश, आपला राष्ट्रध्वज आणि आपली राष्ट्रीय प्रतीके हे खऱ्या अर्थाने सर्व भारतीय नागरिकांची आण-बाण-शान आणि अभिमान बनली पाहिजेत... स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती मनामनात जिवंत राहिल्या पाहिजेत...

किती जणांनी घरदार सोडले
किती जणांनी सर्वस्व अर्पिले...
किती जणांनी रक्त सांडले
किती जणांनी बलिदान दिधले...
त्यांची आठवण थोडी काढूया
त्यांचा त्याग समजून घेऊया...
समर्पणाचे महत्त्व जाणून घेऊया
स्वातंत्र्यलढा आठवूण पाहूया...

१५ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष संपूर्ण भारतभरात अत्यंत उत्साहाने साजरे करण्यात आले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांतर्गत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मेरी मिट्टी मेरा देश अभियान यावर्षी राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात. स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात-अज्ञात नायक, क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसेनानी यांनी केलेला त्याग... दिलेले बलिदान.... लक्षात राहावे. स्वातंत्र्यसंग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सर्व देशभक्तांनी चेतवलेले स्फुल्लिंग सर्व भारतीय जनसामान्य माणसाच्या मनात कायम तेवत राहावे.... आपल्या देदीप्य-मान भारतीय इतिहासाचे अभिमान-पूर्वक संस्मरण व्हावे.... या उदात्त आणि विधायक उद्देशाने मेरी मिट्टी मेरा देश हा उपक्रम या वर्षी राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालये, सर्व सहकारी संस्था, सर्व शैक्षणिक संस्था इथे १३ ऑगस्ट २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ या तीन दिवस नियमानुसार राष्ट्रध्वजाची उभारणी करायची आहे. यासोबतच सर्व खाजगी आस्थापना आणि सर्व नागरिक यांनी स्वयंस्फुर्तीने आपल्या घरोघरी तिरंगा ध्वज उभारायचा आहे.

आपला तिरंगा राष्ट्रध्वज हे आपल्या अस्मितेचे प्रतीक आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वयं-स्फुर्तीने प्रत्येकाने आपापल्या घरावर तिरंगा ध्वज उभारूया. राष्ट्रध्वजाचा उचित मान-सन्मान ठेवूया...

आपल्या देशात विविध जातीचे, धर्माचे, संप्रदायाचे लोक राहतात.... आपल्या देशात अनेक राज्य आहेत ... केंद्रशासित प्रदेश आहेत... वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी भाषा बोलली जाते..... वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या सांस्कृतिक वारसा जपला जातो... आपल्या देशात अनेक बाबतीत विविधता आहे... तरी-सुद्धा देशभक्ती, राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय अस्मिता याबाबतीत आपण सर्वजण एक आहोत... यालाच विविधतेत एकता म्हणतात... आपला भारतीय इतिहास आणि आपल्या परंपरा यांना खूप मोठा दैदिप्यमान वारसा आहे... आपल्या देशात प्रचंड नीतिमत्ता रुजलेली आहे... मूल्य, तत्व, विचार, सहिष्णुता, संवेदनशीलता यांचा भारतीय संस्कृतीमध्ये खूप मोठा प्रभाव आहे... समता, न्याय, बंधुता, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता ही भारतीयांच्या मनामनात आहे.... भारता-मध्ये अत्यंत भावनिक आणि संवेदनशील माणसे राहतात. इथे परस्परांवर प्रेम, आपुलकी, माया-जिव्हाळा लावला जातो. भारतात खऱ्या अर्थाने माणुसकी जपली जाते. मानवता हाच खरा धर्म मानला जातो. केवळ मानवावरच नव्हे तर त्याच्याही पुढे जाऊन प्राणीमात्रावर दया करा... निसर्गाचे संवर्धन करा... या उदात्त्वाचा पाठपुरावा करणारी आमची संस्कृती आहे.

असा उदात्त इतिहास आणि वर्तमान असणाऱ्या देशाचे आम्ही नागरिक आहोत. याची जाणीव ठेवून. राष्ट्रध्वजाचा उचित मान-सन्मान करून .... राष्ट्रध्वजाची संपूर्ण आचारसंहिता पाळून... आम्ही सर्व भारतीय नागरिक दिनांक १३ ऑगस्ट २०२३ ते दिनांक १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत घरोघरी तिरंगा उभारणार आहोत...

तिरंगा आमची आण आहे
तिरंगा आमचा प्राण आहे...
तिरंगा आमची शान आहे
तिरंगा आमचा अभिमान आहे...

हे हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान राबवून सिद्ध करणार आहोत...चला घरोघरी तिरंगा उभारूया...

हे राष्ट्र माझे, मी राष्ट्राचा
शुद्ध भाव हा मनात ठेवूया
देशभक्तीचा वसा घेऊनी
ध्वज तिरंगा फडकवूया...
चला घरोघरी तिरंगा उभारूया...
जात कोणती..?
धर्म कोणता..?
भेदभाव सारे विसरून जाऊया
एक मनाने.... नेक मनाने
पुन्हा नव्याने बंधुभाव जपूया
चला घरोघरी तिरंगा उभारूया...
स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पिले
त्या देशभक्तांना जरा स्मरूया
आजही लढती सीमेवरती
वीर सैनिकांचा आदर करूया...
चला घरोघरी तिरंगा उभारूया...
शान तिरंगा, अभिमान तिरंगा
मान तिरंगी जगास दावूया
सन्मान करूनी राष्ट्रध्वजाचा
आचारसंहिता सारे पाळूया...
चला घरोघरी तिरंगा उभारूया...
एक होऊनी स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सव साजरा करूया
घराघरावर... मनामनावर...
आपुला तिरंगा ध्वज उभारूया...
चला घरोघरी तिरंगा उभारूया...

**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर
मो.९७६७७३३५६०

# श्रावण आला गं बाई...निसर्गाच्या कुंचल्यातून

पावसाळ्याचे पहिले दोन महिने जणू काही वसुंधरेच्या आंघोळीचेच गेले. आभाळ भरून आले, मेघ गरजले आणि तुफानी पाऊस पडला. या नित्यं नेमाने पडणाऱ्या पावसाने राना-वनातील सुप्तावस्थेत असलेली सगळी बीजे जागी झाली. आणि बघता बघता, अवघा निसर्ग हिरवाईने नटला. आता पावसाळा स्थिरावला आहे आणि आपल्यासोबत घेऊन आला आहेउत्साहाचा, ऊन-पावसाच्या खेळाचा आणि सणासुदीचा महिना 'श्रावण'.

श्रावण सुरू होतो आणि वातावरणात एक वेगळाच ताजेपणा जाणवू लागतो. आधीचा तो संततधार आणि रौद्र पाऊस आता काहीसा नरमतो. त्याची जागा घेतात त्या नाजूक 'श्रावण सरी'. ऊन आणि सावलीचा, आणि अचानक येणाऱ्या पावसाचा लपंडाव चालू होतो. हा ऊन-पावसाचा खेळ मनाला जणू काही मोरपिसासारखा स्पर्श करतो. कवी बा.भ. बोरकरांच्या ओळी आठवतात- 'ऊन-पावसाचा हा खेळ पाहूनी, मन माझे हे होई व्याकुळ राणी'.

या श्रावणात राना-वनाचे सौंदर्य खऱ्या अर्थाने खुलून दिसते. मखमली हिरवळीवर छोटी छोटी, रंगबिरंगी रानफुले उमलू लागतात. ही फुले म्हणजे



जणू काही निसर्गाने आपल्या कुंचल्याने पानापानांवर काढलेले छोटे छोटे, नाजूक कलाकृती आहेत. त्यांच्या रंगांची विविधता आणि नाजूकता पाहून पावले तिथेच रेंगाळतात.

या निसर्गाच्या कुंचल्यातील काही मोहक रंग माझ्या कॅमेऱ्यातही कैद झाले. त्या मातीतल्या मखमली हिरवळीतून, पावसाच्या पाण्याचे थेंब घेऊन उमललेले ते सुवर्णपिवळे फुल. त्याचे पाकळ्या जणू काही सोन्याच्या तारांनी विणलेल्या वाटाव्या. त्याची ती नाजूक कांडी, पावसाच्या एकाही थेंबाचा भार सहन करू शकेल की नाही, असे वाटते. हे फुल म्हणजे श्रावणाच्या येण्याची नांदीच जणू.

हिरव्यागार गवताच्या समुद्रात, लहानग्या बेटांसारखी उगवलेली जांभळ्या रंगाची नाजूक फुले. एकाच दांडीवर गुच्छात आलेली ही फुले, वाऱ्यावर डुलताना खूपच मोहक दिसतात. त्यांची ती हलकी जांभळी झाक मनात आनंद निर्माण करते.

मातीच्या काळ्या ढेकळातून आणि ओलसर जमिनीतून उमललेली, गर्द पिवळी पाच पाकळ्यांची फुले. त्याची ती साधेपणा आणि तेज दोन्ही मन जिंकणारे. ती फुले बघून वाटते, की संघर्ष आणि अडचणींवर मात करूनही जगण्याचे सौंदर्य खुलवता येते.

आणि घाणेरीच्या फुलांची ती रंगबिरंगी गुच्छ. गुलाबी, पिवळा, नारंगी असे कितीतरी रंग एकाच वेळी एकाच दांडीवर. या फुलांना कदाचित नावाप्रमाणे वास नसेल, पण त्यांची रंगसंगती बघून मन प्रसन्न होते. या फुलांना 'रंगीत कंदील' म्हणणेच योग्य ठरेल.

या सगळ्या फुलांमध्ये, आकाशाइतकेच निळे असलेले फुल आपले लक्ष वेधून घेते. निळ्याशार पाकळ्या आणि त्यांच्या मधून बाहेर येणारे ते नाजूक पुंकेसर. हे फुल म्हणजे जणू काही श्रावण महिन्याच्या मोकळ्या आकाशाचा एक तुकडा जमिनीवर उतरलेला.

श्रावणात निसर्ग केवळ नटलाच नाही, तर तो आपल्यासोबत उत्साह घेऊन आला आहे. या महिन्यात येणारे सण, उपवास आणि पावसाच्या सरीत भिजण्याची मजा मनाला ताजेतवाने करते. राना-वनातील ही हिरवाई आणि छोटी छोटी फुले बघून, मनातील सर्व चिंता विरघळून जातात. हा महिना आपल्याला निसर्गाच्या जवळ घेऊन जातो आणि आयुष्यातील सौंदर्य शोधायला शिकवतो.

श्रावण सरींचे स्वागत करूया आणि निसर्गाच्या या सुंदर कुंचल्याने काढलेली रांगोळी मनाच्या कोपऱ्यात जतन करून ठेवूया. कारण, निसर्गाच्या या रंगमंचावर श्रावण हा सर्वात सुंदर आणि मनाला भुरळ घालणारा प्रयोग असतो.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत

# वंदे मातरम् : स्वातंत्र्यलढ्याचा बीजमंत्र आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा



भारताच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. या प्रदीर्घ प्रवासात भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची आठवण करून देणाऱ्या अनेक घटना, व्यक्ती आणि प्रतीके आजही आपल्या राष्ट्रीय जीवनाला प्रेरणा देतात. त्यापैकी 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नसून भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण प्रेरणास्रोत आहे.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे गीत त्यांच्या आनंदमठ या कादंबरीत प्रसिद्ध झाले. 'हे मातृभूमी, तुला वंदन' असा या शब्दांचा भावार्थ आहे. भारत-भूमीचे सौंदर्य, समृद्धी, शक्ती आणि मातृत्व यांचे भावपूर्ण चित्रण या गीतातून होते. त्यामुळे हे गीत भारतीयांच्या मनात मातृभूमीविषयी आदर, प्रेम आणि अभिमान निर्माण करणारे ठरले.

१८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी 'वंदे मातरम्'चे गायन केले. त्यानंतर हे गीत राष्ट्रीय चळवळीचा अविभाज्य भाग बनले. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरोधात सुरू झालेल्या स्वदेशी आंदोलनात 'वंदे मातरम्'चा जयघोष जनतेला एकत्र आणणारा ठरला. विद्यार्थी, महिला, कामगार आणि सामान्य नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्माण झालेल्या जनआंदोलनाला या गीताने भावनिक बळ दिले.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय संघर्ष नव्हता; तो आत्मसन्मान, स्वाभिमान आणि राष्ट्रीय अस्मितेचा संघर्ष होता. या संघर्षात 'वंदे मातरम्'ने देशप्रेमाची भावना जागृत ठेवण्याचे काम केले. अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात या गीताने मातृभूमीसाठी त्याग आणि समर्पणाची प्रेरणा निर्माण केली.

आज भारत स्वतंत्र, लोकशाहीवादी आणि प्रगत राष्ट्र म्हणून जगासमोर उभा आहे. मात्र स्वातंत्र्याचा अर्थ केवळ परकीय सत्तेतून मुक्ती एवढाच मर्यादित नाही. देशाच्या एकतेचे रक्षण करणे, संविधानाचा सन्मान करणे, सामाजिक सलोखा टिकवणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे, हेदेखील राष्ट्रसेवेचेच स्वरूप आहे.

'वंदे मातरम्'चा खरा अर्थ आणि संदेश आपण नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. राष्ट्रभक्ती ही केवळ घोषणांमध्ये न राहता ती आपल्या आचरणातून व्यक्त झाली पाहिजे. देशासाठी प्रामाणिकपणे काम करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान करणे, हीच मातृभूमीला खरी वंदना ठरेल. स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षात प्रवेश करताना आपण स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करूया आणि भारताला अधिक सक्षम, समृद्ध, न्याय्य व एकसंध राष्ट्र बनविण्याचा संकल्प करूया. वंदे मातरम्! जय हिंद!

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# संघर्षशील नेतृत्त्व: बबनराव बारसे

शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव रामराव बारसे हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन जिल्ह्यात नावलौकिक झालेले व्यक्तिमत्व आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपले योगदान देऊन त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला.

बारसगाव या छोट्याशा खेड्यात १४ ऑगस्ट १९७४ साली त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हा शेती. त्यावेळेस घरी काही शैक्षणिक वातावरण नव्हते, तरी सुध्दा हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी बी.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. कॉलेजला शिकत असतानाच त्यांना राजकीय सहवास लाभत गेला. त्यामुळे हळूहळू त्यांचे मन राजकारणाकडे वळू लागले. बी.ए.चे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी राजकारणात जाण्याचे ठरवले. लहानपणापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या वक्तृत्वाचा आणि कार्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता, म्हणून १९९५ साली त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला आणि बारसगावचे शाखा प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. चारच वर्षामध्ये त्यांचे कार्य पाहून २००० मध्ये त्यांची शिवसेना तालुका प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. तालुकाप्रमुख हे पद जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त गाजवले.

पुढे त्यांनी ग्रामपंचायत निवडणूक लढविण्याची तयारी सुरु केली. १९९९ साली पहिल्याच ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये त्यांना घवघवीत यश आले. आजपर्यंत बारसगाव ग्रामपंचायत आपल्या ताब्यात ठेवली. २००३ मध्ये झालेल्या नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये त्यांनी बाजी मारून संचालकपदी विराजमान झाले. महात्मा गांधी तंटामुक्ती समिती बारसगावच्या अध्यक्षपदी त्यांची



निवड झाली. या समितीच्या माध्यमातून त्यांनी गावातील तंटे गावातच सोडवायला सुरुवात केली. यामध्ये देखील ते यशस्वी झाले.

छगन भुजबळ हे गृहमंत्री असताना शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अटक झाली. तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलने करण्यात आली. त्याचकाळी त्या आंदोलनामध्ये बबनराव बारसे यांना अटक झाली व ते ३२ दिवस तुरुंगात होते. बबनराव बारसे यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी निवड झाल्यापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घराघरांत पोहोचविण्यासाठी पदाधिकारी व शिवसैनिक जोमाने काम करीत आहेत.

२०१४ मध्ये शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी भोकर विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे उमेदवार म्हणून बबनराव बारसे यांना उमेदवारी देऊन शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांनी प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या उमेदवार सौ. अमिता चव्हाण यांच्या विरोधात ही निवडणूक लढवून तिसऱ्या क्रमांकाची मते मिळविली होती. शाखा प्रमुख, तालुकाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, जिल्हाप्रमुख म्हणून राजकीय प्रवास सुरू. २०१७ मध्ये जिल्हा परिषद निवडणुका लागल्या यामध्ये जि.प. येळेगाव गटातून त्यांनी गावोगावी जावून कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली. विरोधी पक्षांनी सत्तेचा वापर करुन मतदारांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. जनतेने आपले अमूल्य मत मतदानाच्या स्वरुपात बबनरावांच्या खात्यात टाकले. निकालाचा दिवस आला, हजारो लोक निकालाची उत्सुकतेने वाट पाहत होते. शेवटी निकाल लागला. बबनराव बारसे विजयी झाले. त्यांच्या प्रयत्नातून येळेगाव जि.प. सर्कलमध्ये जवळपास ५ कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत.

बबनराव बारसे यांची महत्वाच्या अशा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी शिवसेनेच्या कोट्यातून निवड झाली होती. २०२० ते २०२२ या दोन वर्षात कोविड संकटात बबनराव बारसे यांचे कार्य उल्लेखनिय आहे. कोविडचा प्रादूर्भाव कमी करण्यासाठी त्यांनी तालुक्यात टँकरने फवारणी केली. मास्क वाटप तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कोविड सेंटरमध्ये साहित्य वाटप करून जनसामान्यांना दिलासा दिला. नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत बबनराव बारसे हे संचालक म्हणून बिनविरोध निवडून आले होते. २०२२ मध्ये शिवसेनेत उभी फूट पडून आमदार, खासदार, अनेक पदाधिकारी सत्तेच्या लालसे पोटी शिवसेनेतून बाहेर पडले. शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी निष्ठा ठेवून शिवसेनेची एकनिष्ठ राहिल्याने शिवसेनेत आजही रडायचं नाही तर लढायचे असे म्हणत लढवय्ये जिल्हाप्रमुख म्हणून बबनराव बारसे यांच्याकडे बघितले जाते.

शाखाप्रमुख ते जिल्हाप्रमुख या संपूर्ण प्रवासात जनहितासाठी बरीच आंदोलने केली. त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जिथे अन्याय होत असेल तिथे जावून त्यांनी अन्यायाविरुध्द आवाज उठवला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमी लढत राहिले. कित्येक कार्यकर्त्यांना त्यांनी उभं करुन अन्यायाविरुध्द लढण्याचा एक आवाज दिला. आज अर्धापूर तालुक्यासह जिल्ह्यातील प्रत्येकालाच शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे आपलेसे वाटतात. प्रत्येकांच्या सुख-दुःखात जावून त्यांना भेटतात. त्यांचे कार्य हे संघर्षशील असून, नाही जोड त्याच्या नेतृत्वाला, जय महाराष्ट्र करतो त्यांच्या कर्तृत्वाला. वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**-सखाराम क्षीरसागर**
अर्धापूर

# मनपाच्या शाळांची सुरक्षा, आरोग्य शिबिरे आणि ‘विकसित भारत २०२४’ संकल्पनेवर भर देणार

## महानगरपालिकेच्या शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची बैठक संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)**–महानगरपालिकेच्या पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची बैठक सभापती सदिच्छा सोनी व उपसभापती निरंजना लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता महापालिकेच्या मुख्यालयात संपन्न झाली. या बैठकीत मनपा शाळांचा कायापालट करणे, विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि महिला–बालकांच्या आरोग्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. महानगरपालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांना कुठलीच सुविधा मिळत नसल्याचे वृत्त ‘दैनिक गोदातीर समाचार’ने प्रकाशित केल्यानंतर महापालिकेचा शिक्षण विभाग खडबडून जागा झाला आणि तातडीने अधिकाऱ्यांची बैठक बोलावून सूचना दिल्या.

या बैठकीत प्रारंभी दिनांक २८ जुलै रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या विविध ठरावांच्या प्रगतीचा आणि अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महानगरपालिकांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या व शालेय मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व शाळांना मजबूत संरक्षण भिंत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. मनपाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या अंतर्गत प्रत्येक क्षेत्रात किमान एक याप्रमाणे विशेष महिला व बाल आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या ‘विकसित भारत २०४७’ या संकल्पनेला पूरक ठरेल अशा पद्धतीने मनपा शाळांमध्ये डिजिटल शिक्षण, आधुनिक पायाभूत सुविधा आणि आवश्यक ते सर्व सुधारात्मक बदल तातडीने केले जातील.

मनपाच्या सर्व शाळांमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सुशोभीकरणाला प्राधान्य देण्यासाठी ‘सुंदर शाळा, स्वच्छ शाळा’ हा विशेष उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आणि शाळांचा परिसर आल्हाददायक करण्यासाठी सर्व मनपा शाळांच्या आवारात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाईल. या बैठकीत सभापती यांच्या मान्यतेने बैठकीत आयत्या वेळी आलेल्या इतरही काही स्थानिक व तातडीच्या विकासकामांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या बैठकीला समितीचे सन्माननीय सदस्य, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त गंगाधर ईरलोड, उपायुक्त तथा नगरसचिव अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठ्ठे, शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग, सहा.आयुक्त निलावती डावरे, भांडार अधिक्षक नागनाथ पतंगे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, प्रकल्प व्यवस्थापक चंद्रकांत कदम व प्रवीण मगरे आदी उपस्थित होते.

# लाचखोरीविरोधात नांदेडमध्ये पथनाट्यातून जनजागृती



**नांदेड (प्रतिनिधी)**–भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी तसेच लाच मागणाऱ्या लोकसेवकांविरोधात नागरिकांनी पुढे येऊन तक्रार करावी, यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्राच्या वतीने जनजागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालय परिसर तसेच जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेडसमोर पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांना भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यात आली.

११ ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक प्रीती जाधव, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य तथा जनसंपर्क अधिकारी डॉ. गणेश जोशी आदींची उपस्थिती होती.

नांदेड युनिटचे अधिकारी व अंमलदार, एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहभागातून हा उपक्रम पार पडला. एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक व सदस्यांनी पथनाट्यातून विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये सामान्य नागरिकांना लाचेच्या मागणीला सामोरे जावे लागल्यास कोणती भूमिका घ्यावी, तक्रार कशी करावी आणि भ्रष्टाचाराला विरोध कसा करावा, याचे प्रात्यक्षिक सादर केले.

या माध्यमातून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. पथनाट्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

यानंतर एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक जोशी व सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लाच मागणाऱ्या लोकसेवकांविरोधात तक्रार करा, भ्रष्टाचारासंबंधी कोणतीही माहिती असल्यास किंवा कोणताही लोकसेवक लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी घाबरून न जाता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांसाठी टोल फ्री क्रमांक १०६४ उपलब्ध असून, लाचखोरीविरोधात तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**नांदेड** –नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष आमदार डॉ. तुषार राठोड व उपाध्यक्षा डॉ. मीनल निरंजन पाटील खतगावकर यांनी आपला पदभार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते स्वीकारला. यावेळी उपस्थित आमदार अमरनाथ राजूरकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, बँकेचे संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी अजय कदम आदी उपस्थित होते. (छाया : सचिन डोंगळीकर)

# सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**लोहा (प्रतिनिधी)** –शिष्यवृत्ती–धारक ठरलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पुन्हा उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम गुण मिळवत शिष्यवृत्तीधारक होण्याचा बहुमान मिळविला आहे.

या यशामध्ये इयत्ता पूर्व चौथीतील सार्थक ढगे (१८८ गुण), ऋत्वि मंगनाळे (१८० गुण), विराज कल्याणकर (१८० गुण) आणि स्वरा किरवले (१७६ गुण) यांनी विशेष कामगिरी केली आहे.

तसेच इयत्ता पूर्व सातवीतील राजश्री पाटील (२२६ गुण), वेदिका येडके (२१२ गुण), स्नेहल जालने(२०८ गुण) आणि वेदांत डवरे (१९६ गुण) हे सर्व विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही यावेळी कौतुक करण्यात आले.

मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे उज्ज्वल यश संपादन करावे, अशा शुभेच्छा संस्थेच्या वतीने देण्यात आल्या.

# पावडेवाडी येथे सौ. संगीता पाटील डक यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये प्रचंड मतांनी विजय मिळवल्याबद्दल जिल्हा बँकेच्या नूतन संचालिका सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा पावडेवाडी सेवा सोसायटी व ग्रामपंचायत कार्यालय आणि गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नूतन संचालिका सौ. संगीता डक पाटील यांनी निवडून दिल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नांदेड तालुक्यातील पावडेवाडी येथे नांदेड जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी माधवराव पावडे, पंचायत समितीचे माजी सभापती बंडू भाऊराव पावडे, उपसरपंच बंडू पावडे, पावडेवाडी सेवा सोसायटीचे चेअरमन दादाराव पावडे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पावडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, बाबुराव पावडे, ज्ञानोबा माळकरी, पांडुरंग पावडे, सेवा सोसायटीचे संचालक प्रल्हाद पावडे, माधव तात्या, नवनाथ पावडे, विलास पावडे, व्यंकट पावडे, तसेच संजय कारभारी, दादाराव पावडे, ज्ञानबा पावडे, गुलाबराव पावडे, योगेश पावडे, राजकुमार पावडे, तानाजी पावडे, साईनाथ पावडे, शिवाजी पावडे, सदाशिव पावडे, देवराव पावडे, बाबुराव पावडे, काशिनाथ पावडे, नारायण पावडे, गोविंदराव पावडे, भगवान पावडे, भगवानराव हंबर्डे, विलास पावडे, गंगाधर होळकर, सुनील पावडे, शांतनू पावडे, चेअरमन शंकर शिंदे, वैजनाथ सूर्यवंशी, एकनाथ जोगदंड, बालाजी जाधव, थुगाव येथील माधव भोसले, कुंडलिकराव बोकारे, बालाजी डुकरे, पुरभाजी कळके, ज्ञानेश्वर शिंदे, विष्णू पाटील, अनिल पुयड, साई महाजन, शहाजी भोसले, शुभम सावंत, युवराज दळवे, संतोष माने, प्रकाश भोसले, गंगाधर भोसले, माधव मोरे, रामभाऊ पावडे, पांडुरंग पावडे, गोविंद मामा सूर्यवंशी, आबाराव पावडे, पंडित पावडे, साहेबराव पावडे, तानाजी पावडे, व्यंकट पावडे यावेळी आदी जणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# निधी भरघोस; मात्र विकासकामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह!

## मरवाळीतील नाथोबा मंदिर जोडरस्त्याच्या कामाबाबत नागरिकांमध्ये नाराजी; कामांची चौकशी करण्याची मागणी



**नरसी (प्रतिनिधी)**– नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार यांच्या माध्यमातून विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असून, वाडी–वस्ती, तांडे तसेच गावागावांत रस्ते, नाल्या, समाजमंदिरे, संरक्षण भिंती आदी कामांचा सपाटा सुरू आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे मार्गी लागत असल्याचे चित्र आहे. मात्र, दुसरीकडे या विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

नायगाव तालुक्यातील मरवाळी येथे ग्रामीण रस्ते विकास मजबुतीकरण योजनेंतर्गत (३०५४–३११२) नाथोबा मंदिर जोडरस्त्याची सुधारणा करण्यासाठी ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. ग्रा. मा.–४५ वरील कि.मी. ००/०० ते ०१/०० या अंतरातील या रस्त्याचे लोकार्पण आ. राजेश पवार यांच्या हस्ते व भाजपा जिल्हा सरचिटणीस सौ. पुनमताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

निधी आणणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्या निधीतून होणाऱ्या कामांचा दर्जा राखणेही महत्त्वाचे आहे, अशी भूमिका नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मरवाळी येथील रस्त्याच्या कामाबाबत स्थानिक नागरिकांकडून कामाच्या गुणवत्तेबाबत नाराजी व्यक्त केली जात असून, करोडो रुपयांचा निधी खर्च करूनही कामे थातूरमातूर होत असतील तर विकासाचा नेमका फायदा कोणाला?, असा सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित कंत्राटदारांकडून दर्जेदार काम करून घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या अभियंत्यांची असताना प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेवर पुरेसे नियंत्रण आहे का, याचीही चौकशी होणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, काही ठिकाणी कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणेतील अधिकारी–अभियंत्यांच्या संगन–मतामुळे कामाच्या दर्जाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून, त्याची सक्षम यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचेही अनेकांनी मत व्यक्त केले.

# सिडकोतील मातृसेवा आरोग्य केंद्रात ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करण्याची नगरसेवक संजय घोगरे यांची मागणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या आयोजित सर्वसाधारण सभेत सिडको परिसरातील मातृसेवा आरोग्य केंद्र येथे पूर्ण वेळ महिला व पुरुष डॉक्टरांसह प्रसूतीगृह व शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करून सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय दूर करावी, तसेच हडको परिसरातील लहुजी नगर भागातील नागरिकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला रस्ता तत्काळ मुख्य रस्त्यास जोडून येथील नागरिकांचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

नांवामनपाची सर्वसाधारण सभा ११ ऑगस्ट रोजी मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती.



यावेळी महापौर सौ.कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, निलेश सुंकेवार यांच्यासह विविध विभागांचे सहायक आयुक्त, विभाग प्रमुख व नगरसेवक यांची उपस्थिती होती.

यावेळी सिडको येथील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे गेल्या काही वर्षांपूर्वी प्रसूतीगृह व शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटरसह पूर्ण वेळ महिला व पुरुष डॉक्टर कार्यान्वित होते. ते बंद करून नांदेड येथे हलविण्यात आल्यामुळे महिला रुग्णांसह सामान्य रुग्णांना आर्थिक फटका बसत असल्याने पुन्हा या ठिकाणी रुग्णालय चालू करून दिलासा द्यावा, यासह नांदेड– उस्मानगर–कंधार मुख्य मार्गावर असलेल्या मनपा हद्दीतील मनपा प्रभाग क्रमांक २० मधील लहुजी नगर भागातील मुख्य रस्त्याबाबत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत लहुजी नगर हडको भागातील मुख्य मार्गालगत असलेल्या वसाहतीत गेल्या अनेक वर्षांपासून जवळपास शेकडो कुटुंबे या परिसरात वास्तव्यास आहेत. या भागातील मूलभूत समस्या सोडविण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रेचे १५ ऑगस्ट रोजी आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्री हुजूर साहेब नांदेड सिडको साईबाबा नगर बीडी कॉलनी येथील साईबाबा मंदिर येथून १५ ऑगस्ट रोजी शिर्डीकडे पदयात्रा प्रस्थान करणार आहे. ही पदयात्रा मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात येऊन पदयात्रेची सुरूवात होणार आहे.

या पदयात्रेत भाविक–भक्त सहभागी होणार असून, ही पदयात्रा ४१७ किलोमीटर आहे. यात पहिल्या दिवशी सिडको ते मरळक, आरळ,परभणी,पाळोदी,पाथरी, आष्टी, पिपरखेडा, घुंगरडे हदगाव, ऊचेगाव, पैठण, भायेगाव, नेवासा मार्ग शिर्डी येथे २९ ऑगस्ट रोजी ४१७ किलोमीटर अंतर चालून ही पदयात्रा पोहचणार असल्याचे संयोजकांनी कळविले आहे.

# मराठवाडास्तरीय दृष्टीहीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि तेजोमय पुरस्कार वितरण उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)**– तेजोमय प्रतिष्ठान नांदेड या संस्थेच्या तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून मराठवाडास्तरीय १० वी आणि १२ वी उत्तीर्ण दृष्टीहीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि तेजोमय पुरस्कार वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हा कार्यक्रम येथील पीपल्स कॉलेजमधील नरहर कुरूंदकर सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात मराठवाड्यातील १० वी आणि १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या दृष्टीहीन विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्र, स्मृतीचिन्ह आणि शैक्षणिक उपयोगी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. समाजातील उपेक्षित घटकांसाठी उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या लायन्स क्लब प्राइड, नांदेड या संस्थेला तेजोमय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर सौ. कविता मुळे, ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ व बार असोसिएशन नांदेडचे माजी अध्यक्ष ॲड. शिवाजीराव हाके, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. नितीन भागडी, लायन्स क्लब नांदेडचे माजी अध्यक्ष अभिजीत रैनापूरकर, लायन्स क्लब नांदेडचे अध्यक्ष परेश मुनोद, तेजोमय प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामजी मुंढे, सुधीर शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी डॉ. नितीन भागडिया यांनी अन्नदान केले. डॉ. गायत्री वाडेकर, डॉ. शुभांगी पतंगे, डॉ. भावना भगत, सौ. सुनंदा देवणे, सचिव, नंदीग्राम रोटरी क्लब, नांदेड आणि डॉ. सुरभी राठोड, अध्यक्ष, नंदीग्राम रोटरी क्लब नांदेड यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. दीपाली मुंडे यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे महासचिव ज्ञानेश्वर आहेरकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार किरण हुंडेकर यांनी मानले.

# अर्धापूर पोलिसांची मोठी कारवाई; कत्तलीसाठी नेण्यात येणारे १२ गोवंशीय जनावरे व पिकअप जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने नांदेड जिल्ह्यात गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत अर्धापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत १२ गोवंशीय जनावरांची सुटका करून महिंद्रा पिकअपसह एकूण ८ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी करीम कॉलनी, अर्धापूर येथील कॅनॉलच्या पूर्वेकडील परिसरात करण्यात आली.

पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार परिसरात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून तपासणी केली असता महिंद्रा पिकअप एमएच-३२–क्यू–५१३८ मध्ये वाहतुकीसाठी भरून ठेवलेली ३ जनावरे टिनपत्राच्या शेडमध्ये कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवलेली ९ जनावरे

अशी एकूण १२ बैल आढळून आली. जनावरांना निर्दयीपणे वागणूक दिली जात असल्याचे दिसून आले.

पोलिसांनी तातडीने सर्व १२ गोवंशीय जनावरांची सुटका करून त्यांना सुरक्षित ताब्यात घेतले.

१२ गोवंशीय जनावरे अंदाजे किंमत ४ लाख ६५ हजार, महिंद्रा पिकअप क्र. एमएच-३२–क्यू-५१३८ अंदाजे किंमत ४ लाख असा एकूण ८ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तुळशिदास दादाराव गावंडे (वय ३१, रा. विठोली, ता. जि. यवतमाळ), शेख करीमुद्दीन शेख वहिमोद्दीन (वय ३८, व्यवसाय व्यापारी, रा. बिलालनगर, अर्धापूर), नामदेव देवराव नरवाडे, (वय ५८, व्यवसाय व्यापारी, रा. शेवाळा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) यांना अटक केली आहे.

# महात्मा गांधी डीएड कॉलेज येथे सूक्ष्म अध्यापनकार्यशाळा संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महात्मा गांधी डीएड कॉलेज सिडको नवीन नांदेड येथे सूक्ष्म अध्यापन कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली.

या कार्यशाळेत प्रस्तावना, स्पष्टीकरण, प्रश्न पातळी, शैक्षणिक साधनांचा वापर व फलक लेखन इत्यादी पाच कौशल्यांचा व सेतू पाठ यांचा सराव करून घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रा. राजेश पाईकराव, प्रा. नाझिया बेग, प्रा. शिवनंदा पत्रे, प्रा. पुनम पांचाळ, प्रा. मनीषा सोनकांबळे, प्रा. अक्षय जाधव, प्रा. डॉ. स्नेहल थोरात यांनी मार्गदर्शन व सूक्ष्म अध्यापन कौशल्याचे दिग्दर्शन पाठ घेतले. या कार्यशाळेसाठी दीपाली नलावार, ओंकार लिंगाडे, दुर्गा कुलकर्णी, शीला पवार व ताईबाई पवळे यांनी प्रयत्न केले.

सूक्ष्म अध्यापन हे शिक्षकांसाठी अध्यापनातील हृदय असून, ते विकसित करण्यासाठी सर्व छात्रध्यापकांनी प्रयत्न केले आहेत. सर्वांनी प्रत्यक्ष शिक्षक म्हणून काम करताना सूक्ष्म अध्यापन लक्षात घेऊन अध्ययन करावे व स्वतःला यशस्वी शिक्षक म्हणून सिद्ध करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. सुरेश घुले यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले. सूक्ष्म अध्यापन कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांनी समारोपप्रसंगी आम्ही निर्भय झालो असून, आम्ही शिक्षक व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी तयार झालो आहोत, असे मत आम्रपाली वाघमारे, रोहिणी कापसे, दीक्षा कांबळे, मयुरी डाखोरे, महेक शेख, समीक्षा बोकारे, सिद्धी बोकारे, कोकरे, ढगे, पुयड, शबनम शेख, नेहा मच्छिंद्र, स्नेहा राऊत, श्यामसुंदर चौधरी, बोरकर, सलामे, करपे, विठ्ठल कलेपवाड, पावडे इत्यादी विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी व्यक्त केले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवनंदा पत्रे यांनी केले.

# अंतर्मन

## गंगाजलानेच भगवान शिवांचा अभिषेक का केला जातो?

### इतर नद्यांचे पाणी कावडीतून का आणले जात नाही?



**श्रावण महिना सुरू झाला असून, देशभरातील शिवभक्त भगवान भोलेनाथांच्या भक्तीत तल्लीन झाले आहेत. हजारो भाविक कावडीत गंगाजल भरून शेकडो किलोमीटरची पायी यात्रा करत शिवालयांमध्ये पोहोचत आहेत. मात्र, एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. शिवलिंगावर अभिषेक करण्यासाठी विशेषतः गंगाजलच का आणले जाते ? इतर नद्यांचे पाणी का आणले जात नाही ? यामागे धार्मिक श्रद्धा, पौराणिक मान्यता आणि काही पारंपरिक समजुती असल्याचे सांगितले जाते.**

### कावडीत गंगाजलच का आणले जाते?

भगवान शिवाचा जलाभिषेक करण्यासाठी अनेक शिवभक्त शेकडो किलोमीटरची पायी यात्रा करून गंगाजल आणतात. प्रवासाच्या मार्गात अनेक नद्या येत असतानाही भाविक गंगाजलाला विशेष प्राधान्य देतात. कठीण कावड यात्रेमागे भगवान शिवांवरील अढळ श्रद्धा आणि भक्तिभाव असल्याचे मानले जाते. धार्मिक ग्रंथांतील काही उल्लेखांनुसार श्रावण ते भाद्रपद या कालावधीत अनेक नद्यांच्या पाण्याबाबत विशिष्ट धार्मिक नियम सांगितले आहेत. मात्र, स्कंद पुराणात सिंधू, शुतुद्री, चंद्रभागा, सरयू, नर्मदा, यमुना, सरस्वती आणि गंगा या नद्यांचा विशेष उल्लेख आढळतो. या नद्यांचे पाणी धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले जाते. त्यामुळे केवळ गंगाजलच पवित्र आणि इतर नद्यांचे पाणी अशुद्ध, असा सरसकट अर्थ काढता येत नाही. मात्र, कावड यात्रेच्या परंपरेत गंगाजलाला विशेष स्थान मिळाले आहे.

### गंगेचा भगवान शिवांशी काय संबंध?

हिंदू धार्मिक मान्यतेनुसार गंगा नदीचा उगम भगवान विष्णूंच्या चरणांपासून झाला आणि पृथ्वीवर अवतरण्यापूर्वी तिचा प्रचंड वेग नियंत्रित करण्यासाठी भगवान शिवांनी तिला आपल्या जटांमध्ये धारण केले. या पौराणिक संबंधामुळे गंगा आणि भगवान शिव यांचे अतूट नाते मानले जाते. त्यामुळे गंगाजल भगवान शिवांना अर्पण करणे अत्यंत पुण्यकारक आणि पवित्र मानले जाते. काही पौराणिक कथांमध्ये देवी गंगेला भगवान शिवांबद्दल विशेष भक्तिभाव असल्याचाही उल्लेख आढळतो. शिवांच्या जटांमध्ये स्थान मिळणे हे गंगेच्या पावित्र्याशी आणि भगवान शिवांशी असलेल्या नात्याशी जोडले जाते.

### गंगाजलाची परंपरा कशी सुरू झाली?

एका पौराणिक कथेनुसार, भगवान परशुराम हे भगवान शिवांचे परमभक्त होते. शिवभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी भगवान शिवांचा जलाभिषेक करण्यासाठी कावडीतून गंगाजल आणले आणि त्याने शिवलिंगाचा अभिषेक केला. या कथेनुसार, त्यानंतर कावडीत गंगाजल भरून आणणे आणि त्या जलाने भगवान शिवांचा अभिषेक करण्याची परंपरा रूढ झाली, असे मानले जाते.

### वैज्ञानिक दृष्टिकोन काय सांगतो?

गंगाजलाच्या पावित्र्याबाबत धार्मिक श्रद्धेबरोबरच त्याच्या गुणधर्मांचीही चर्चा केली जाते. गंगाजलामध्ये बॅक्टेरियोफेज नावाचे सूक्ष्मजीवभक्षी विषाणू आढळतात, जे काही जीवाणूंना नष्ट करण्यास सक्षम असतात. गंगेच्या पाण्याच्या विशिष्ट गुणधर्मांमागे याचाही काही प्रमाणात संबंध असल्याचे संशोधनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, याचा अर्थ गंगाजल नेहमीच पूर्णपणे निर्जंतुक किंवा सर्व प्रकारच्या प्रदूषणापासून मुक्त असते, असा घेता येणार नाही. गंगेच्या विविध भागांतील पाण्याची गुणवत्ता प्रदूषणानुसार बदलू शकते.

### श्रद्धा आणि परंपरेचे प्रतीक कावड यात्रा

कावड यात्रा ही केवळ गंगाजल आणण्याची परंपरा नसून भगवान शिवांप्रती असलेल्या भक्ती, त्याग आणि श्रद्धेचे प्रतीक मानली जाते. अनेक किलोमीटर पायी प्रवास करून गंगाजल आणणे आणि ते शिवलिंगावर अर्पण करणे, हा भक्तांसाठी आध्यात्मिक साधनेचा एक भाग आहे. त्यामुळे श्रावण महिन्यात कावडीतून गंगाजल आणून भगवान शिवांचा अभिषेक करण्याची परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने पाळली जाते.

## श्रीकृष्ण जन्माष्टमी 3 की 4 सप्टेंबरला?

### जाणून घ्या योग्य तारीख, मुहूर्त अन् धार्मिक महत्त्व...

**भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव म्हणून साजरी केली जाणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाच्या अष्टमी तिथीला येते. यंदा जन्माष्टमी ३ की ४ सप्टेंबरला साजरी करायची, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम आहे. पंचांगाच्या गणनेनुसार यंदा जन्माष्टमीला विशेष योग जुळून येत असल्याचे सांगितले जात आहे. धार्मिक मान्यतेनुसार, जन्माष्टमीचे व्रत केल्याने जन्मोजन्मीची पापे नष्ट होतात आणि भगवान श्रीकृष्णाची कृपा प्राप्त होते. या दिवशी भगवान श्रीकृष्णाच्या बालरूपाची पूजा केली जाते.**

पंडित राकेश झा यांच्या माहितीनुसार, पंचांगाच्या गणनेनुसार यंदा जन्माष्टमीच्या दिवशी जयंती योग तयार होत आहे. भाद्रपद कृष्ण पक्षातील अष्टमी तिथी ३ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजून २६ मिनिटांनी सुरू होईल आणि ४ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजून १४ मिनिटांनी समाप्त होईल. भगवान श्रीकृष्णाचा जन्म रोहिणी नक्षत्रात झाला असल्याने जन्माष्टमीच्या दिवशी रोहिणी नक्षत्राला विशेष महत्त्व आहे. यंदा रोहिणी नक्षत्र ३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी सुरू होऊन ४ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजून १४ मिनिटांपर्यंत राहील. पंचांगाच्या गणनेनुसार, यंदा श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव ४ सप्टेंबर २०२६ रोजी साजरा केला जाईल.



### पद्मपुराणात जन्माष्टमीच्या व्रताचे महत्त्व

पद्मपुराणानुसार, भाद्रपद महिन्यात रोहिणी नक्षत्र, बुधवार किंवा सोमवार यांचा संयोग असलेल्या जन्माष्टमीचे व्रत करणाऱ्या भाविकांना विशेष पुण्य प्राप्त होते, अशी धार्मिक मान्यता आहे. तसेच या व्रताच्या प्रभावामुळे अनेक पिढ्यांतील पितरांना मुक्ती मिळते, असेही पुराणात नमूद असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीचे व्रत करून मध्यरात्री भगवान श्रीकृष्णाच्या बालरूपाची पूजा करणे धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.



### जन्माष्टमीचे धार्मिक महत्त्व


श्रीमद्भागवत आणि विविध पुराणांतील वर्णनानुसार, भगवान श्रीकृष्णांचा जन्म भाद्रपद कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला, रोहिणी नक्षत्रात आणि वृषभ राशीतील चंद्राच्या सान्निध्यात मध्यरात्री झाला होता. त्यामुळे जन्माष्टमीच्या पूजेमध्ये अष्टमी तिथी, रोहिणी नक्षत्र आणि मध्यरात्रीच्या काळाला विशेष महत्त्व आहे. पंडित राकेश झा यांच्या मते, जन्माष्टमीच्या दिवशी अष्टमी तिथी, रोहिणी नक्षत्र आणि सोमवार किंवा बुधवार यांचा संयोग झाल्यास तो अत्यंत शुभ मानला जातो. यंदा ४ सप्टेंबर रोजी शुक्रवार, अर्धरात्रव्यापी अष्टमी तिथी, रोहिणी नक्षत्र आणि वृषभ राशीतील चंद्र असा धार्मिकदृष्ट्या पुण्यदायी योग जुळून येत असल्याचे सांगितले जाते.

### ‘केवलाष्टमी’ आणि ‘जयंती’ म्हणजे काय?

पंडितांच्या मते, जन्माष्टमीच्या दिवशी रोहिणी नक्षत्राचा संयोग नसल्यास तिला ‘केवलाष्टमी’, तर रोहिणी नक्षत्राचा संयोग असल्यास ‘जयंती’ असे संबोधले जाते. ‘जयंती’सोबत बुधवार किंवा सोमवारचा योग जुळून आल्यास तो अत्यंत शुभ आणि फलदायी मानला जातो. मात्र, अष्टमी तिथीशिवाय ‘जयंती’ला स्वतंत्र अस्तित्व नाही. प्राचीन काळापासून अर्धरात्रव्यापी अष्टमी तिथीत रोहिणी नक्षत्र नसले तरी जन्माष्टमीचे व्रत आणि उपवास करण्याची परंपरा आहे.

### महत्त्वाच्या तारखा

| तपशील | वेळ |
|---|---|
| अष्टमी तिथी प्रारंभ | ३ सप्टेंबर, रात्री १२.२६ वाजता |
| रोहिणी नक्षत्र प्रारंभ | ३ सप्टेंबर, रात्री ११.३० वाजता |
| अष्टमी तिथी समाप्त | ४ सप्टेंबर, रात्री १२.१४ वाजता |
| श्रीकृष्ण जन्माष्टमी | ४ सप्टेंबर २०२६ |



## श्रावणातील पुत्रदा एकादशीचे व्रत 23 की 24 ऑगस्टला?

### जाणून घ्या तारीख, मुहूर्त अन् धार्मिक महत्त्व...

**श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला पवित्रा एकादशी किंवा पुत्रदा एकादशी असे म्हटले जाते. हिंदू धर्मात या एकादशीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णूची भक्तिभावाने पूजा करून उपवास केल्यास मनोकामना पूर्ण होतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे. तसेच भगवान शिव आणि माता पार्वतीची आराधना केल्यानेही विशेष कृपा प्राप्त होते, असे मानले जाते.**



### पुत्रदा एकादशीचे व्रत कधी करावे?

पंचांगानुसार, पवित्रा-पुत्रदा एकादशीची तिथी २३ ऑगस्ट २०२६ रोजी सूर्योदयाच्या वेळी सुरू होत असून २४ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजून १९ मिनिटांनी समाप्त होईल. एकादशीचे व्रत सूर्योदयाच्या वेळी असलेल्या तिथीनुसार करण्याची परंपरा आहे. त्यामुळे २३ ऑगस्ट २०२६ रोजी पवित्रा-पुत्रदा एकादशीचे व्रत करणे योग्य ठरेल, असे पंडित राकेश झा यांनी सांगितले आहे.

### पूजेसाठी शुभ मुहूर्त

- २३ ऑगस्ट रोजी पूजेसाठी चौघड्यानुसार पुढील वेळा शुभ मानल्या जातात.
- लाभ चौघडिया : सकाळी ९.०९ ते १०.४६
- अमृत चौघडिया : सकाळी १०.४६ ते दुपारी १२.२४
- या काळात भगवान विष्णूची पूजा, नामस्मरण आणि व्रताचे धार्मिक विधी करता येतील.

### पुत्रदा एकादशी व्रताचे महत्त्व

पद्मपुराणात वर्णिलेल्या कथेनुसार, राजा महीजित यांना संतान नव्हते. ऋषी लोमेश यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी पुत्रदा एकादशीचे व्रत केले आणि त्याचे पुण्य समर्पित केले. त्यानंतर त्यांना संतानप्राप्ती झाली, अशी कथा आहे. त्यामुळे संतानप्राप्तीची इच्छा असणाऱ्यांसाठी पुत्रदा एकादशीचे व्रत विशेष फलदायी मानले जाते. भगवान विष्णूची भक्तिभावाने पूजा आणि व्रत केल्याने संतानसुखाची कामना पूर्ण होते, तसेच जीवनातील अडचणी दूर होतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

### वर्षातून दोनदा येते पुत्रदा एकादशी

पुत्रदा एकादशी वर्षातून दोन वेळा येते. त्यापैकी एक श्रावण महिन्यात, तर दुसरी पौष महिन्यात येते. दोन्ही एकादशींच्या कथा आणि धार्मिक मान्यता वेगवेगळ्या आहेत. श्रावणातील पुत्रदा एकादशीची कथा राजा महीजित आणि ऋषी लोमेश यांच्याशी संबंधित आहे. या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा केल्याने पापांचा नाश होतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे. त्याचबरोबर भगवान शिव आणि माता पार्वतीचीही आराधना करणे शुभ मानले जाते.



## अस्वस्थता वाढली? श्रावणात करा ही कामे; भगवान शिवांची कृपा लाभेल!

**हिंदू धर्मात श्रावण महिना भगवान शिवांच्या आराधनेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो.**



**धार्मिक मान्यतेनुसार, या महिन्यात श्रद्धेने भगवान शिवांची पूजा, अभिषेक आणि मंत्रजप केल्याने मनाला शांतता मिळते आणि जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याचे बळ मिळते. भवितव्यामध्ये घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीत बदल करणे शक्य नसले, तरी शिवआराधनेमुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊ शकतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे. श्रावण महिन्यात दररोज भगवान शिवांना जल अर्पण करून बेलपत्र वाहण्याची परंपरा आहे. यामुळे शिवकृपा प्राप्त होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.**

शिवभक्तीनंतर मनातील दुःख आणि अस्वस्थता कमी होऊन मानसिक समाधानाची अनुभूती मिळते, असे मानले जाते. कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी आणि संकटांपासून संरक्षण मिळावे, या श्रद्धेने विशेषतः महिला श्रावणात भगवान शिवांची आराधना करतात. भगवान शिव हे लवकर प्रसन्न होणारे देव मानले जातात. अविवाहित मुलींना इच्छित वर आणि विवाहित महिलांना संततीसुख प्राप्त व्हावे, यासाठीही शिवपूजा केली जाते. त्यामुळे भगवान शिवांची आराधना करण्यासाठी श्रावण महिना विशेष फलदायी मानला जातो.

### चंद्र आणि मनाचा संबंध

ज्योतिषशास्त्रीय मान्यतेनुसार चंद्र हा मनाचा कारक मानला जातो. त्यामुळे श्रावण महिन्यात भगवान शिवांची भक्तिभावाने पूजा करून सोमवारी व्रत केल्यास मनातील चिंता आणि दुःख कमी होण्यास मदत होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. चंद्राचा संबंध औषधी वनस्पतींशीही जोडला जात असल्याने श्रावणातील उपवास आणि सात्त्विक आहार आरोग्यासाठीही उपयुक्त असल्याचे पारंपरिक मत आहे. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने उपवास करताना आपल्या प्रकृतीनुसार आहार घेणे आवश्यक आहे. श्रावण महिना प्रामुख्याने देवाधिदेव भगवान शिवांच्या उपासनेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या काळात भक्त जप, तप, ध्यान आणि पूजेद्वारे शिवआराधना करतात.

### चंद्र आणि मनाचा संबंध

ज्योतिषशास्त्रीय मान्यतेनुसार चंद्र हा मनाचा कारक मानला जातो. त्यामुळे श्रावण महिन्यात भगवान शिवांची भक्तिभावाने पूजा करून सोमवारी व्रत केल्यास मनातील चिंता आणि दुःख कमी होण्यास मदत होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. चंद्राचा संबंध औषधी वनस्पतींशीही जोडला जात असल्याने श्रावणातील उपवास आणि सात्त्विक आहार आरोग्यासाठीही उपयुक्त असल्याचे पारंपरिक मत आहे. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने उपवास करताना आपल्या प्रकृतीनुसार आहार घेणे आवश्यक आहे. श्रावण महिना प्रामुख्याने देवाधिदेव भगवान शिवांच्या उपासनेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या काळात भक्त जप, तप, ध्यान आणि पूजेद्वारे शिवआराधना करतात.

- शिवलिंगाची पूजा का केली जाते? : धार्मिक मान्यतेनुसार शिवलिंग हे विश्वाचे प्रतीक मानले जाते. विश्वातील सर्व ग्रह-नक्षत्रांचा त्याच्याशी संबंध असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे भगवान शिवांची उपासना केल्याने ग्रहदोषांचा त्रास कमी होतो, अशी ज्योतिषशास्त्रीय मान्यता आहे. श्रावण महिन्यात रुद्राभिषेक आणि महामृत्युंजय मंत्राचा जप केल्याने संकटे, आजार, अल्पायुष्याचा दोष आणि ग्रहबाधा दूर होण्यास मदत होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. या श्रद्धांना वैज्ञानिक उपचारांचा पर्याय मानू नये; आजारपण असल्यास वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक आहे.
- श्रावणात कोणते मंत्र आणि स्तोत्र म्हणावे? : श्रावण महिन्यात आपल्या श्रद्धेनुसार भगवान शिवांचे विविध मंत्र आणि स्तोत्रांचे पठण करता येते. उदाहरणार्थ : शिवाष्टक, शिवतांडव स्तोत्र, शिवमहिम्न स्तोत्र, शिवचालिसा, शिवसहस्रनाम, महामृत्युंजय मंत्र, भगवान शिवांच्या विविध मंत्रांचा जप... यापैकी काहीही शक्य नसल्यास मनापासून भगवान शिवांचे स्मरण करावे आणि सत्कर्म करण्याचा प्रयत्न करावा, असा धार्मिक संदेश दिला जातो.
- साध्या पद्धतीनेही करता येते शिवपूजा : भगवान शिवांना ‘आशुतोष’ म्हणजेच अल्प पूजेतही प्रसन्न होणारे देव मानले जाते. त्यामुळे भव्य पूजाविधी करणे शक्य नसले तरी साध्या पद्धतीने शिवपूजा करता येते. एक तांब्या किंवा लोटा जल, अक्षता आणि बेलपत्र अर्पण करून भगवान शिवांचे मनापासून स्मरण करता येते. ‘ॐ नमः शिवाय’चा जप करणे किंवा श्रद्धेने ‘हर हर महादेव’चा जयघोष करणे, हेदेखील भक्तीचा भाग मानले जाते.
- मन शांत ठेवण्यासाठी श्रावणातील उपासना : श्रावणातील शिवआराधना ही केवळ धार्मिक विधी नसून मन एकाग्र करण्याचे आणि सकारात्मक विचार वाढविण्याचे माध्यम ठरू शकते. नियमित प्रार्थना, ध्यान, मंत्रजप, सात्त्विक आहार आणि सत्कर्म यामुळे मनाला शांतता मिळण्यास मदत होऊ शकते. श्रद्धेने भगवान शिवांचे स्मरण करा, सत्कर्म करा आणि जीवनातील अडचणींना धैर्याने सामोरे जा, हीच श्रावण महिन्याची खरी शिकवण मानली जाते.

# आरमूरजवळ ट्रॅव्हल्सला कंटेनरची धडक; २ महिला ठार



**किनवट (प्रतिनिधी)** –हैदराबाद येथील चिन्ना जियार स्वामी यांच्या दर्शनासाठी किनवटहून निघालेल्या महिलांच्या ट्रॅव्हल्सला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर आरमूरजवळ गुरुवारी (दि. १३) सकाळी भीषण अपघात झाला. टायर फुटल्याने महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्सला पाठीमागून आलेल्या भरधाव कंटेनर ट्रकने जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत ट्रॅव्हल्समधून खाली उतरलेल्या माधवी किरण किनवटकर - तिरमनवार आणि सुजाता अशोक नेम्मानीवार या दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर सुनीता प्रकाश गुंटापेल्लीवार व मनी भास्कर नेम्मानीवार या दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.

किनवट येथील सुमारे ६० महिला दोन खासगी ट्रॅव्हल्समधून चिन्ना जियार स्वामी यांच्या दर्शनासाठी हैदराबादच्या दिशेने निघाल्या होत्या. प्रवासादरम्यान एका ट्रॅव्हल्सचा टायर फुटल्याने ती राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला थांबविण्यात आली होती. टायर बदलण्याचे काम सुरू असताना, काही महिला ट्रॅव्हल्समधून खाली उतरल्या होत्या. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या कंटेनरने उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्सला जोरदार धडक दिली.

कंटेनरच्या धडकेने ट्रॅव्हल्सला जोरदार हादरा बसला. यावेळी खाली उतरलेल्या दोन महिला ट्रॅव्हल्सखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अन्य दोन महिला गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर निझामाबाद येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. अपघातात काही महिलांना किरकोळ दुखापत झाल्याचेही समजते.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, दुर्घटनेची वार्ता किनवटमध्ये पोहोचताच शहरावर शोककळा पसरली. दर्शनासाठी आनंदाने निघालेल्या महिलांच्या यात्रेला भीषण अपघाताचे गालबोट लागल्याने किनवटकरांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. श्रावण महिन्याच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या या दुर्घटनेने मृत महिलांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे दोन दिवस नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वा. नाशिक विमानतळ येथून खाजगी विमानाने नांदेडकडे प्रयाण. सायं. ६ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सायं. ६.१५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. रात्री ८ वा. नांदेड येथून शासकीय वाहनाने हिंगोलीकडे प्रयाण. रात्री ९.३० वा. शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे आगमन व मुक्काम. शनिवार १५ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वा. वारंगा फाटा येथून शासकीय वाहनाने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. दुपारी ४ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व खाजगी विमानाने नाशिककडे प्रयाण करतील.

# दीप अमावस्येच्या पूर्वसंध्येला बरडशेवाळा दत्त मंदिरात ६० हून अधिक संत-महंतांचा मेळावा



**नांदेड (प्रतिनिधी)** – श्री दसनाम दत्त आखाडा सुरक्षा न्यास, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून गेल्या ५ वर्षांपासून दर महिन्याच्या अमावास्येला विविध संस्थानांवर 'निजात्मबोध ग्रंथ' ज्ञानचर्चा व भव्य सत्संग सोहळा आयोजित केला जातो. याच उपक्रमांतर्गत बरडशेवाळा ता. हदगाव येथील दत्त मंदिरावर बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी भव्य सत्संग सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्याचे आयोजन दत्त मंदिराचे महंत प्रज्ञाचक्षू बालयोगी श्री संत भगवानगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून आणि बालयोगी श्री संत श्यामसुंदर गिरी महाराज यांच्या नियोजनातून करण्यात आले होते. सत्संग सोहळ्याला श्रीश्रीश्री १००८ महंत ईश्वर भारती महाराज, संगम हिरवा, परमपूज्य श्री संत वासुदेव भारती महाराज, माहूरगड, श्रीश्रीश्री १००८ अष्टकौशल्य महंत नारायणगिरी महाराज, वडगुंफा व गाडीपुरा नांदेड, महंत गोपाळगिरी महाराज, दत्तबर्डी हदगाव, १०८ महंत श्यामगिरी महाराज, हरबळ, महंत देवगिरी महाराज, दिघी, महंत ईश्वरगिरी महाराज, पाथरड यांच्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातील मंदिरांचे जवळपास ६० हून अधिक संत-महंत व गुरुवर्य उपस्थित होते.

सत्संग सोहळ्यात सुमारे तीन तासांहून अधिक काळ 'निजात्मबोध ग्रंथ' यावर ज्ञानचर्चा झाली. सर्व संत-महंतांनी एकत्रित बैठक पद्धतीने पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला.

दीप अमावस्येच्या पूर्वसंध्येला आणि पवित्र श्रावण महिन्याच्या उंबरठ्यावर झालेल्या या सत्संगामुळे भाविक-भक्तांना संत दर्शन व मार्गदर्शनाचा दुर्मिळ योग लाभला. बरडशेवाळा येथील दत्त मंदिरावरील हा पहिला सत्संग सोहळा भाविकांच्या कायम लक्षात राहील असा ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बरडशेवाळा व परिसरातील भक्त मंडळींनी अथक परिश्रम घेतले.

# हर घर तिरंगा जनजागृती रॅली

## महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी कॅडेट्सचा सक्रिय सहभाग



**नांदेड (प्रतिनिधी)** – भारतीय स्वातंत्र्याच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण, राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करणे आणि प्रत्येक घरावर तिरंगा फडकविण्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हर घर तिरंगा अभियानांतर्गत नांदेड महानगरपालिकेच्या वतीने बुधवारी तिरंगा जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत बाबानगर येथील महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी आर्मी विंग व एनसीसी एअर विंगच्या सुमारे १०० कॅडेट्सनी शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला.

या रॅलीमध्ये नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत कॅडेट्सनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर घोषणा दिल्या. त्यामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. रॅलीची सुरुवात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या पुतळ्यापासून झाली. त्यानंतर महात्मा फुले यांचा पुतळामार्गे रॅली महात्मा गांधी यांच्या पुतळा येथे पोहोचली. येथे सर्व मान्यवर, एनसीसी कॅडेट्स व नागरिकांनी एकत्रित राष्ट्रगीत गायन करून रॅलीचा समारोप केला.

या उपक्रमासाठी महात्मा फुले हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांनी विशेष मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे पर्यवेक्षक खानजोडे व एस. व्ही. जाधव यांनीही मोलाचे सहकार्य केले. रॅलीचे संपूर्ण नियोजन महात्मा फुले हायस्कूलचे सेकंड ऑफिसर पी. एस. केंद्रे आणि फर्स्ट ऑफिसर दत्ता बारसे यांनी केले. शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हर घर तिरंगा जनजागृती रॅली यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## व्यंकटराव माधवराव इप्पर यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील रहिवासी व मूळचे नागझरी तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथील व्यंकटराव माधवराव इप्पर वय ८१ यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, दोन सुना, नातवंड, पत्नी असा मोठा परिवार आहे.

त्यांच्या पार्थिव देहावर शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सिडको स्मशानभूमी येथे सकाळी १० अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## देशभरातील कारागीर, उद्योजक व स्वदेशी उत्पादनांचा रंगणार सोहळा

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** –भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने व 'शिखाज कारागिरी' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान तीन दिवसीय 'स्वदेशी फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पो २०२६' या हस्तकला मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे.

सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या या प्रदर्शनासाठी देशभरातील स्वदेशी उत्पादने, हस्तकला, हातमाग, फॅशन व लाईफस्टाईल वस्तूंचे स्टॉल उभारण्यात येत आहेत. स्टॉलधारकांसाठी मंडप, वीज व्यवस्था व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन

## मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतिगृह,

**उच्च शिक्षण, नांदेड विभाग,**

तथागत नगर, मालेगाव रोड, नांदेड - ४३१६०५

E-mail ID : ebcnanded@gmail.com

**:::: निविदा ::::**

मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतिगृह, तथागतनगर, मालेगांव रोड, नांदेड साठी शैक्षणिक वर्ष २०२६- २०२७ साठी १०० विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी लागणारे (०१) अन्नधान्य व किराणा (०२) भाजीपाला पुरवठा (०३) दुध पुरवठा करणेसाठी इच्छुक पुरवठाधारकांकडून सीलबंद निविदा याद्वारे मागविण्यात येत आहे.

सदरील कोऱ्या निविदा प्रस्तूत वसतिगृहातील कार्यालयात रु. ५००/- भरुन प्राप्त होतील. कोऱ्या निविदेसोबत निविदा संदर्भातील नियम, अटी व शर्ती सोबत जोडलेल्या आहेत.

सदरील निविदाप्रमाणे वरील (०१) अन्नधान्य व किराणा (०२) भाजीपाला पुरवठा (०३) दूध पुरवठा करणेचा कालावधी हा शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठीच मर्यादित राहिल. कोऱ्या निविदा प्राप्त करुन घेणे व भरुन सादर करणेसाठी दि. १४.०८.२०२६ ते दि. २०.०८.२०२६ या कालावधीत मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतिगृह, तथागतनगर, मालेगांव रोड, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुटूटीचे दिवस वगळून) प्राप्त व स्विकारल्या जातील. प्राप्त निविदा ह्या मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांचे कार्यालयातील दालनात उघडण्यात येतील.

निविदेतील दर हे चालू बाजार भावापेक्षा जास्त राहणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी तसेच निविदेतील दर मंजूर अथवा नामंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी राखून ठेवलेले आहेत.

**स्थळ :- नांदेड**
**दिनांक :- १२.०८.२०२६**

**स्वाक्षरीत/-**
**गृहप्रमुख,**
**मातोश्री शासकीय ई.बी.सी.**
**वसतिगृह, नांदेड.**

## Change In Name

My Old Name is **DIPIKA SHANKAR LIMBGAONKAR** which now I am Changing as New Name **DEEPIKA SHANKARRAO MUKTAWAR.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.
**Address - gurukrupa nivas shivaji nagar, Nanded . 9420256999**

## Change In Name

My old name is **SOANKAMBLE SANJIVANI RAJU** and my New Name is **HALDEKAR SANJIVANI MOHANRAO.** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same
**Address :- Vasant Nagar, Near Blue Bells English School.Naigaon. Tq. Naigaon , Dis: Nanded**

## Change In Name

My old Name is **RESHMA BEGUM** Which now I am Changing as New Name **RESHMA TABASSUM MOHD ATHAR.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.
Address: **H.NO.1-7-1590, PIR BURHAN NAGAR, GALLI NO.12, NANDED-431605 Mob: 9850175644**

## Change In Name

My Old Name is **DUDAKIKAR SHRIDHAR SUDHAKARRAO** which now I am Changing as New Name **SHRIDHAR SUDHAKARRAO DUDKIKAR.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.
**Address - ND42 P1 20/05 HUDCO NEW NANDED 431603**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH ABUSUFIYAN HARUN** which now I am Changing as New Name **SHAIKH ABUSUFIYAN SHAIKH HARUN.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.
**Address - Dhangar takli, Parbhani, Maharashtra - 431511**
**Mo. No. +91 87677 08843**

## Change In Name

My old Name is **MOHAMMAD YOUSUF** Which now I am Changing as New Name **MOHD YOUSUF ASHFAQ MOHD YOUNUS.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
**Address: H.NO.1-16-225, SUNDAR NAGAR, NEAR AZIZ KIRANA STORE, TARODA BK, NANDED-431605 Mob: 9730606411**

### जाहीर प्रगटन

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४४/ २०२६**

**पुढील तारीख** - २०.०८.२०२६

अर्जदार: १) गंगाबाई भ्र. दत्ता कोळनुरे, वय ७० वर्ष, धंदा घरकाम,
२) मनोहर पि. दत्ता कोळनुरे, वय ४६ वर्ष, धंदा शेती,
३) दिनकर पि. दत्तात्रय कोळनुरे , वय ४४ वर्ष, धंदा शेती,
अर्जदार क्र. १ ते ३ रा. आदमपुर, ता. बिलोली, जि. नांदेड
४) भारतबाई भ्र. मुरारी कंधारे, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. कौठा, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द.**

गैरअर्जदारः मा.व्यवस्थपक दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड, शाखा सगरोळी,
ता. बिलोली, जि. नांदेड

**विषय-वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की,**मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे अर्जदार क्र ०१ ही पत्नी तसेच अर्जदार क्र. ०२ ते ०३ हे यांच्या अपत्य असुन कायदेशीर वारस आहेत. **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचा मृत्यु दिनांक २३.०१.२०२६ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे गैरअर्जदार यांच्या शाखेत खालील तक्ता मध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.

| अनु. क्र. | बँक नाव व शाखा | खाते क्र. | जमा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१) | दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड, शाखा सगरोळी, | ११४५१०१११०००४०० (जुना खाते क्र. ११४५१११११०३५७०) | १,०९,१७९/- - |

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत दत्ता पि. लक्ष्मण कोळनुरे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

### जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर ,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६७/ २०२६** पुढील तारीख - २१.०९.२०२६

अर्जदार : ०१. अनुराधा भ्र.व्यंकटराव नरवाडे , वय - ८२ वर्षे, व्यवसाय - घरकाम ,
०२. पद्मीनबाई भ्र. व्यंकटराव नरवाडे , वय - ६४ व्यवसाय - घरकाम,
०३. अविनाश पि.व्यंकटराव नरवाडे , वय - ३५ वर्षे, व्यवसाय - शेती,
अर्जदार क्र १ ते ३ रा.गुजरी ता.बिलोली जि.नांदेड
०४. गायत्री भ्र.तिरुपती शिंदे , वय २६ वर्षे, व्यवसाय - घरकाम ,
रा. नागनी ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द.

गैरअर्जदारः निरंक .

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, **मयत व्यंकटराव पि.भाऊराव नरवाडे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हि **मयत व्यंकटराव पि.भाऊराव नरवाडे** यांची पत्न्या असुन अर्जदार क्रमांक ०३ व ०४ हे **मयत व्यंकटराव पि.भाऊराव नरवाडे** यांचे अर्जदार क्र ०३ ही मुलगी व अर्जदार क्र ०४ हा मुलगा आहे. आहेत. **मयत व्यंकटराव पि.भाऊराव नरवाडे** यांचा मृत्यु दिनांक १२.१२.२०२५ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ह्यांना **मयत व्यंकटराव पि.भाऊराव नरवाडे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

### जाहीर प्रगटन

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६५/ २०२६**

**पुढील तारीख** - १५.०९.२०२६

अर्जदार : १) सरस्वती भ्र. गंगाधर कोंडावार, वय ६० वर्षे, धंदा घरकाम,
२) नरसिमलू पि. गंगाधर कोंडावार, वय ४१ वर्षे, धंदा शेती,
दोघेही रा. कोटलावार गल्ली, कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हे **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ही **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक ०२ हे **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे अपत्य आहे. तसेच **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे आई व वडिलांचा मृत्यु यापुर्वीच झाले. **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचा मृत्यु दिनांक १८.०४.२०२६ रोजी **कोटलावार गल्ली, कुंडलवाडी ता. बिलोली** येथे झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हयांना **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटन/नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे वारस असल्याचे हकाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत गंगाधर पि. नरसिमलू कोंडावार** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की श्री हनुमंतराव देवराव वडजे हे आमच्या जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, फत्तेजंगपुर, तालुका व जिल्हा नांदेड. या संस्थेचे सभासद असून, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संस्थेच्या मालकिची जमिन गट नंबर (१४१) मौजे फत्तेजंगपूर, ता. जि. नांदेड मध्ये संस्थेच्या लेआऊट प्रमाणे त्यांच्या मालकिचा व ताब्यातील प्लॉट नंबर (७६) शहात्तर हा आहे. सदरील प्लॉट नंबर (७६) शहात्तर श्री हनुमंतराव देवराव वडजे हे त्यांचा मुलगा श्री पंढरीनाथ हनुमंतराव वडजे यांच्या नावावर हस्तांतरण कार्यवाही करून, प्लॉट हस्तांतरण करून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह, त्यांनी संस्थेकडे विनंती अर्ज दिलेला आहे.

तरी या सदरील प्लॉट हस्तांतरण कार्यवाहीस कोणाचा आक्षेप असल्यास (७) दिवसाच्या आत अध्यक्ष अथवा सचिव यांच्या कडे मुळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. ह्या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही, असे समजून वरीलप्रमाणे प्लॉट ची हस्तांतरण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** — **अध्यक्ष**
**जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी निर्माण संस्था मर्या.**
**फत्तेजंगपूर ता.जि. नांदेड**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# मनपाच्या वतीने काढण्यात आलेल्या तिरंगा बाईक रॅलीला प्रतिसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत हडको ते नांदेड तिरंगा बाईक रॅलीला महापौर सौ. कविता मुळे, आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्यासह सिडको प्रभागातील नगरसेवक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी व पदाधिकारी यांनी सहभागी होत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा-निमित्त हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता तसेच भारतीय राष्ट्रध्वजाविषयी आदर, अभिमान आणि जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने भव्य तिरंगा बाईक रॅली हडको ते तिरंगा ध्वज दुचाकी रॅली १३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, हडको, नांदेड ते तिरंगा ध्वज (शहीद जवान स्मारक) शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय चौक, व्ही.आय.पी. रोड, नांदेड येथे संपन्न झाली.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी १५ ऑगस्ट दिनानिमित्त डिजिटल स्वाक्षरी मोहीम महापौर सौ. कविता मुळे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली तर रॅलीचे उद्घाटन हिरवी झेंडी दाखवून महापौर मुळे व आयुक्त डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले. सिडको प्रभागातील नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्यासह नगरसेवक रॅलीत सहभागी झाले होते.

या रॅलीत स्वतः दुचाकी चालवत महापौर कविता मुळे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपसभापती निरंजना लांडगे, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, गणेश काकडे, अति.आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपाल संधू, नितीन गढवे, सहायक आयुक्त गुलाम सादेक, नागनाथ पतंगे, राजेश जाधव, रावण सोनसळे, डॉ. शेख रईसोद्दीन, गौतम कावडे, रमेश चवरे, अभियंता प्रकाश कांबळे, संघरत्न सोनसळे, शहर अभियंता दिलीप टाकळीकर, कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी, मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर यांच्यासह मनपाचे विविध विभाग प्रमुख, कार्यालयीन कर्मचारी, महिला कर्मचारी व विविध क्षेत्रातील पदाधिकारी सहभागी झाले होते.

यावेळी वंदे मातरम्, भारत माता की, जय आदी घोषणा व तिरंगा ध्वज फडकवत उत्साहात दुचाकीस्वार दिसून आले. रॅलीपुढे मनपाच्या अग्निशामक दलाचे जवान दुचाकीवर अग्रेसर होते. रॅलीचे आयोजन सिडको क्षेत्रीय कार्यालय सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले तर संचलन जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे यांनी केले.










**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com